## प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ९२८८ /२०२३ पुणे शहर, दिनांक २९/१२/२०२३

**विषय :- दिनांक ०१/०१/२०२४ रोजी, कोरेगाव भिमा जवळील पेरणेफाटा,ता.हवेली जि.पुणे येथील विजयस्तंभास अभिवादन कार्यक्रमाचे अनुषंगाने दिनांक-३१/१२/२०२३ रोजी सायं.१७.०० वा. पासुन ते दिनांक- ०१/०१/२०२४ रोजी,रात्रौ २४.०० वा.चे दरम्यान करण्यात येणा-या वाहतूकीच्या बदलाबाबत.**

---------oo--------

पेरणेफाटा,पेरणेगाव ता.हवेली जि.पुणे येथील विजयस्तंभास अभिवादन कार्यक्रमाचे अनुषंगाने सालाबाद प्रमाणे दिनांक ०१/०१/२०२४ रोजी विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी राज्यातील व राज्याबाहेरील मोठया प्रमाणात नागरीक, संघटना सामील होत असतात. त्यामुळे पुणे-अहमदनगर मार्गावरील पेरणे फाटा येथे गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये, याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतूकीकरीता तसेच पार्किंग संदर्भात खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**अ)** पुणे व पिंपरी चिंचवड शहराकडून, नगररोड वरुन अहमदनगर कडे जाणा-या सर्व प्रकारच्या वाहनांनी (पेरणेफाटा विजयस्तंभाकडे जाणारी वाहने खेरीज करुन) **दिनांक- ३१/१२/२०२३ रोजीपासुन १४.०० वा. पासुन (आवश्यकतेनुसार) ते दिनांक ०१/०१/२०२४ रोजी रात्री २४.०० वा.** पर्यंत खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा.

**मार्ग :-**

१) पुणे बाजूकडून अहमदनगर बाजूकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी, खराडी बायपास येथुन उजवीकडे वळण घेवून मुंढवा चौक, मगरपट्टा चौक, डावीकडे वळण घेवून पुणे सोलापूर हायवे रोडने केडगाव चौफुला, न्हावरा, शिरुर मार्गे नगररोड असे जावे. **(विजयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींची वाहने वगळून)**

२) सोलापूर रोडवरुन आळंदी, चाकण याभागात जाणाऱ्या वाहन चालकांनी हडपसर, मगरपट्टा चौक, उजवीकडे वळण घेवून खराडी बायपासमार्गे विश्रांतवाडी येथून आळंदी व चाकण येथे जावे. **(विजयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींची वाहने वगळून)**

३) मुंबई येथून अहमदनगर बाजूकडे जाणारी जड वाहतूक वडगाव मावळ, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटा मार्ग अहमदनगर अशी जातील. **(विजयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींची वाहने वगळून)**

४) मुंबई येथून अहमदनगर बाजूकडे जाणारी हलकी वाहने (कार,जीप) वडगावमावळ, चाकण, खेड, पाबळ, शिरुर मार्गे अहमदनगर अशी जातील. **(विजयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींची वाहने वगळून)**

५) कोल्हापूर, सांगली, सातारा, कात्रज मार्गे मंतरवाडी फाटा, मगरपट्टा चौक येथून नगरकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी हडपसर येथून पुणे सोलापूर हायवेने केडगाव चौफुला,न्हावरा,शिरुर मार्गे नगररोड असे जावे. **(विजयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींची वाहने वगळून)**

६) **इंद्रायणी नदीवरील आळंदी - तुळापूर हा पुल दि. १०/०१/२०२२ रोजी जड वाहनांनाकरीता बंद करण्यात आला असल्याने सदर ठिकाणाहून केवळ अनुयायांच्या हलक्या चारचाकी वाहनांना प्रवेश दिला जाईल. अनुयायांच्या जड वाहनांनी चाकण-शिक्रापूर रोडचा वापर करावा.**

७) **विश्रांतवाडी - लोहगांव मार्गे वाघोली व वाघोली - लोहगांव मार्गे विश्रांतवाडीकडे जाणारी जड वाहतूक दि. ३१/०१/२०२३ ते ०१/०१/२०२४ रोजी दरम्यान बंद करण्यात येत आहे. (विजयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींची वाहने वगळून)**

ब) विजयस्तंभास अभिवादनाकरीता जाणा-या नागरीकाकंरीता खालीलप्रमाणे वाहन पार्कींगस्थळे निश्चित केली असून वाहनचालकांनी सदर पार्किंगचे ठिकाणीच आपली वाहने पार्क करावीत.

वाहन पार्कींग ठिकाणे-

- पुणे, आळंदी, थेरुर केसनंद,अष्टापुर डोंगरगावचे दिशेने पेरणेफाटा, येथील विजयस्तंभास अभिवादन करण्यास येणा-या नागरींकांचे वाहनांकरीता पार्कीग ठिकाणे-

| अ.क्र. | पार्कीग ठिकाण | पार्क होणा-या वाहनांचा प्रकार |
|---|---|---|
| | **१) पुणेकडून येणा-या वाहनांसाठी पार्कीग ठिकाणे.**<br>**टिप :- पार्किंग ठिकाणापासून विजयस्तंभा पर्यंत पीएमपीएमएल बसेसची सुविधा करण्यात आली आहे.** | |
| १ | लोणीकंद आपले घर शेजारील पार्किंग क्र. १ | दुचाकी पार्किंग |
| २ | लोणीकंद आपले घर शेजारील पार्किंग क्र. २ | चारचाकी पार्किंग |
| ३ | लोणीकंद बौद्ध वस्ती शेजारी पार्किंग क्र. ३ | चारचाकी पार्किंग |
| ४ | लोणीकंद आपले घर सोसायटीचे मागील पार्किंग क्र. ४ | खाजगी बस व मोठी वाहने |
| ५ | लोणीकंद मोनिका हॉटेल शेजारील पार्किंग क्र. ५ | दुचाकी पार्किंग |
| ६ | हॉटेल ओम साई लॉजच्या पाठीमागील पार्किंग क्र. ६ | चारचाकी पार्किंग |
| ७ | तुळापुर फाटा स्टफ कंपनी शेजारी पार्किंग क्र. ७ | चारचाकी पार्किंग |
| ८ | तुळापुर फाटा राजशाही मिसळ हॉटेल मागे पार्किंग क्र. ८ | दुचाकी पार्किंग |
| | **➢ एक जानेवारी रोजी पुणे आणि थेऊरकडून येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांची वर्दळ जास्त असल्याने लोणीकंद चौकात वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून लोणीकंदकडून खंडोबा माळ आणि सोमेश्वर पार्किंगकडे जाणारा मार्ग एकेरी राहिल (पीएमपीएमएल बस वगळून)** | |
| | **२) आळंदीकडून येणा-या वाहनांकरीता पार्कीग**<br>**टिप :- पार्किंग ठिकाणापासून विजयस्तंभा पर्यंत पीएमपीएमएल बसेसची सुविधा करण्यात आली आहे.** | |
| | पार्कीग ठिकाण | पार्क होणा-या वाहनांचा प्रकार |
| ९ | तुळापुर रोड वाय पॉईंट समोरील पार्किंग क्र. ९ | चारचाकी पार्किंग |
| १० | तुळापुर रोड हॉटेल शेतकरी मिसळ शेजारील पार्किंग क्र. १० | दुचाकी पार्कींग |
| ११ | तुळापुर रोड हॉटेल रॉयल लॉजचे शेजारी पार्किंग क्र. ११ | दुचाकी पार्किंग |
| १२ | तुळापुर रोड हॉटेल चिंचवन समोर रॉयल लॉजमागे पार्किंग क्र. १२ | चारचाकी पार्कींग |
| १३ | तुळापुर रोड फुलगाव सैनिकी शाळा मैदान पार्किंग क्र. १३ | चारचाकी पार्किंग |
| | **३) थेऊर / सोलापूर कडून येणाया वाहनांसाठी**<br>**टिप :- पार्किंग ठिकाणापासून विजयस्तंभा पर्यंत पीएमपीएमएल बसेसची सुविधा करण्यात आली आहे.** | |
| १४ | सोमवंशी अॅकॅडमी समोर थेऊर रोड पार्किंग क्र. १४ | चारचाकी पार्किंग |
| १५ | थेऊर रोड, खंडोबाचा माळ वेअर हाऊस शेजारी पार्किंग क्र १५ | चारचाकी पार्किंग |
| १६ | थेऊर रोड खंडोबा माळ पार्किंग क्र. १६ | दुचाकी पार्कींग |
| | **४) अष्टापुर डोंगरगावचे दिशेने येणा-या वाहनांकरीता पार्कीग**<br>**टिप :- पार्किंग ठिकाणापासून विजयस्तंभा पर्यंत पीएमपीएमएल बसेसची सुविधा करण्यात आली आहे.** | |
| १७ | पेरणे गाव छत्रपती शिवाजी महाराज पुतळया समोरील मोकळे मैदान पार्किंग क्र. १७ | दुचाकी/चारचाकी पार्किंग |

27-12-2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक,
पुणे शहर